MHHI050005602022

दाखल तारीख : १७.०६.२०२२
नोंदणी तारीख : १८.०६.२०२२
निकाल तारीख : ३०.०३.२०२६
कालावधी : ०३ वर्ष, ०९ म. १३ दि.

**दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर वसमत, ता. वसमत, जि. हिंगोली यांचे न्यायालय**

(पिठासीन अधिकारी श्री. अजय द. पुंडलीक )

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२८१/२०२२** **निशाणी क्र.३८.**

१. **श्रीरंग पिता अमृता काळे,**
वय – ६० वर्षे, धंदा – शेती,
रा. चिखली ता. वसमत, जि. हिंगोली.

२. **भागेरथाबाई भ्र. दत्तराव दाभाडे,**
वय — ६५ वर्षे, धंदा – घरकाम,
रा. आडगांव बा. ता. जिंतुर, जि. परभणी. ..... **अर्जदार**

– **विरूध्द** –

१. **जिजाबाई भ्र. अमृता काळे,**
वय – ८२ वर्षे, धंदा – निरंक,

२. **रामचंद्र पिता अमृता काळे,**
वय – ५५ वर्षे, धंदा – शेती,
दोघे रा. चिखली, ता. वसमत, जि. हिंगोली. ..... **गैरअर्जदार**

---

**बॉम्बे रेग्युलेशन अक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी**

---

---

अर्जदारातर्फे श्री. एस.एन. अडकीणे वकील
गैरअर्जदारातर्फे श्री. एस.एस. आलम वकील

---

# न्यायनिर्णय

(दिनांक ३०.०३.२०२६ रोजी पारीत)

सदरचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन अक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराने अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१, २ व गैरअर्जदार क्र.२ हे आपसात सख्खे भाऊ बहीण आहे व गैरअर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.१,२ व गैरअर्जदार क्र.२ ची आई आहे. गैरअर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.१,२ व गैरअर्जदार क्र.२ चे वडील मयत अमृता पिता सखाराम काळे हे दिनांक २४.०४.२०१६ रोजी वृध्दापकाळाने मयत झाले आहे. मयत अमृता पिता सखाराम काळे यांचे आई वडील ब–याच वर्षापुर्वी मयत झालेले आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांच्याशिवाय मयतांना कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची गरज आहे. म्हणून प्रार्थनेप्रमाणे अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०३. गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी निशाणी १४ प्रमाणे त्यांचा जबाब दाखल केला आहे. गैरअर्जदारांनी निशाणी १ मधील काहीअंशी मजकुर मान्य केला आहे परंतु, अर्जदार क्र.१ मयत अमृताचा वारस राहीलेला नाही तो दत्तक दिलेला आहे व अर्जदार क्र.१ हा शामराव काळे यांचा वारस आहे. अर्जदार क्र.१ चा मयताच्या कुटूंबाशी काही एक संबंध नाही व तो शामराव काळे यांचा दत्तक पुत्र आहे. अर्जदार क्र.२ व गैरअर्जदार क्र.१ व २ हेच मयताचे वारस आहे. मयत अमृताची मिळकत हडप करण्यासाठी हा अर्ज दाखल केला आहे, असे स्पष्टीकरण दिलेले आहे व अधिकच्या स्पष्टीकरणात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ व २ यांनी महत्वाच्या बाबी न्यायालयापासून लपवून ठेवले आहे. अर्जदारांचा अर्ज कायदेच्या कक्षेत बसत नाही. अर्जदार क्र.१ दिनांक १९.०२.१९७९ रोजी नोंदणीकृत दस्त क्र.३४८/१९७९ नुसार शामराव काळे यांना दत्तक दिलेला आहे व अर्जदार क्र.१

त्यांचा दत्तक मुलगा झालेला आहे. अर्जदार क्र.२ व गैरअर्जदार क्र.१ व २ यांच्याशी कोणतेही नातेसंबंध शिल्लक राहीलेले नाही. अर्जदार क्र.१ चा मयत अमृता काळेच्या कुटूंबाशी कोणताही संबंध राहीलेला नाही व तो मयताचा वारस होवू शकत नाही. मयताच्या नावाने असलेली मिळकत हडप करण्यासाठी हा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र.१ हा मयताचा वारस म्हणून पात्र राहीलेला नाही म्हणून अर्जदार क्र.१ ला वारस प्रमाणपत्र देता येणार नाही. अर्जदार क्र.२ व गैरअर्जदार क्र.१ व २ हेच वारस असल्याने त्यांच्या हक्कात वारसप्रमाणपत्र देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

०४. अर्जदार व गैरअर्जदार यांनी केलेल्या कथनावरुन खालील मुद्दे काढण्यात आलेले आहे त्याच्या निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ व २ हे सिध्द करु शकले काय की, अर्जदार क्र.१ व २ हे मयत अमृता पिता सखाराम काळे, यांचे वारस आहे ? | नाही. |
| २. | गैरअर्जदार क्र.१ व २ हे सिध्द करु शकले काय की, गैरअर्जदार क्र.१,२ व अर्जदार क्र.२ हेच फक्त मयत अमृता पिता सखाराम काळे यांची वारस आहे ? | नाही. |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

०५. अर्जदार क्र.१ याने त्याच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१७ प्रमाणे दिले आहे.

गैरअर्जदार क्र.२ ने त्याचा पराव निशाणी २८ प्रमाणे दिला आहे. तसेच, गैरअर्जदार क्र.२ तर्फे साक्षीदार क्र.२ विलास वडसंगकर दुय्यम निबंधक, वसमत यांचा पुरावा निशाणी ३५ प्रमाणे देण्यात आलेला आहे. त्याच्या पुराव्यादरम्यान दत्तकपत्र निशाणी ३६ देण्यात आली आहे.

**<u>मुद्दा क्र.१ व २ करीताः</u>**

०६. मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांच्या निष्कर्षाचा विचार एकत्रीत करण्यता आलेला आहे.

०७. अर्जदाराच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जदाराच्या वकीलांनी अर्जाप्रमाणे व पुराव्याप्रमाणे युक्तीवाद केला. अर्जदार मयताचे वारस आहे. तसेच, अर्जदार क्र.१ च्या शाळा निर्गम ता–याचे व आधार कार्डचे वाचन करुन दाखविले. तसेच, अर्जदार सर्वांच्या नावाने वारसप्रमाणपत्र मांगत आहे. तसेच, गैरअर्जदार क्र.१ ने पुरावा दिलेला नाही यावरुन तिला वारस असल्याचे मान्य आहे. गैरअर्जदार क्र.२ ने खोटा पुरावा दिलेला आहे. तसेच, गैरअर्जदार क्र.२ त्याच्या अपत्य नाकारत आहे. सख्खा भाऊ असतांना खोटे सांगत आहे. तसेच, गैरअर्जदारातर्फे साक्षीदार क्र.२ ने निशाणी ३६ मध्ये दिलेल्या कबुलींचे वाचन करुन दाखविले. निशाणी ३६ चा दस्त अस्पष्ट आहे. दत्तापत्रामध्ये श्रीरंग हा श्रीरंग आहे किंवा दुसरा श्रीरंग आहे हे स्पष्ट होत नाही. गैरअर्जदारांनी खोटा बचाव घेतलेला आहे. अर्जदार मयताचे वारस आहे. गैरअर्जदारांचा बचाव स्वीकारण्याजोगा नाही. त्याने दिलेला पुरावा लेखी जबाबाप्रमाणे नाही. असा व ईतर युक्तीवाद करुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०८. गैरअर्जदाराच्या वकीलांनी दिलेल्या लेखी जबाबाप्रमाणे युक्तीवाद केला. तसेच, अर्जदार क्र.१ श्रीरंग दिनांक १९.०२.१९७९ रोजी दत्तक दिलेला आहे म्हणून तो मयत अमृताचा वारस राहीलेला नाही. अर्जदार यांनी मुद्दा क्र.१ सिध्द केलेला नाही. तसेच, अर्जदार क्र.१ ने त्याच्या उलटतपासात दिलेल्या कबुलींचे वाचन करुन दाखविले. शेती हडप करण्यासाठी वारसप्रमाणपत्राची मागणी केली आहे हे त्याने मान्य केले आहे. गैरअर्जदार यांनी मुद्दा क्र.२ सिध्द केलेला आहे. गैरअर्जदार क्र.२ च्या उलटतपासामध्ये कोणतीही महत्वाची कबुली त्याने दिलेली नाही. गैरअर्जदारातर्फे साक्षीदार क्र.२ सहाय्यक निबंधक, वसमत यांनी निशाणी ३६ प्रमाणे दत्तकपत्र सिध्द केलेले आहे व अर्जदार क्र.१ श्रीरंग, शामरावला दत्ता दिलेला आहे त्यामुळे मयत अमृतचा वारस राहीलेला नाही म्हणून वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र राहीलेला नाही, असा व ईतर सविस्तर युक्तीवाद करुन अर्जदार क्र.१ ला वारसप्रमाणपत्र देवून नये अशी विनंती केली.

०९. अर्जदार क्र.१ ने त्याच्या पुराव्यात असे सांगीतले आहे की, अर्जदार क्र.२ त्याची बहीण आहे व गैरअर्जदार क्र.१ त्याची आई आहे व गैरअर्जदार क्र.२ त्याचा भाऊ आहे. त्याचे वडील अमृता पिता सखाराम काळे, दिनांक २४.०४.२०१६ रोजी मरणपावले आहे. तसेच, अमृताचे आई वडील ब–याच वर्षापुर्वी मरणपावलेले आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांच्याशिवाय ईतर कोणीही वारस मयताला नाही. शासकीय व निमशासकीय कामासाठी वारसप्रमाणपत्राची गरज असल्याचे सांगीतले आहे.

१०. उलटतपासामध्ये त्याने हे मान्य केले आहे की, त्याने केलेला अर्ज शेतजमीन गट क्र.२१७ या शेतासाठी केलेला आहे. तसेच, त्याने दत्तक दिल्याचे नाकारले आहे. तसेच, ईतर सुचना देखील नाकारलेल्या आहे.

११. गैरअर्जदार क्र.२ याने त्याच्या लेखी जबाबाप्रमाणे पुरावा शपथपत्रामध्ये मजकुर नमुद केला आहे व अर्जदार क्र.१ दिनांक १९.०२.१९७९ रोजी दस्त क्र.३४८/१९७९ नुसार शामराव पांडोजी काळे यांना दत्तक दिल्याचे सांगीतले आहे व अर्जदार क्र.१ श्रीरंग मयत अमृताचा वारस राहीलेला नाही. अर्जदार क्र.२ व गैरअर्जदार हेच मयत अमृताचे वारस असल्याचे सांगीतले आहे. तसेच, अमृताच्या नावाने मिळकती असल्यामुळे त्या हडपण्यासाठी अर्जदाराने हा अर्ज केल्याचे सांगीतले आहे.

१२. उलटतपासामध्ये त्याने त्याच्या वडीलाचे नांव अमृता सखाराम काळे असल्याचे मान्य केले आहे तसेच, अर्जदार क्र.१ सोबतचे नातेसंबंध नाकारले आहे व अर्जदार क्र.१ जिजाबाईचा व अमृतरावचा मुलगा असल्याचे नाकारले आहे. तसेच, अर्जदार क्र.१ चे नैसर्गीक आई वडील जिजाबाई व अमृतराव असल्याचे देखील नाकारले आहे तसेच, ईतर सुचना देखील नाकारले आहे.

१३. गैरअर्जदारातर्फे साक्षीदार क्र.२ विलास वडसंगकर सहाय्यक दुय्यम निबंधक वसमत यांनी त्याच्या पुराव्यात असे सांगीतले आहे की, दत्तकपत्र दस्त क्र.३४८/१९७९ त्यांच्या कार्यालयात रजिस्ट्र झालेला आहे त्यानुसार सदर दस्त श्रीरंगला दत्तक दिल्याबाबत आहे व दत्तक घेणार शामराव हे आहे व त्याचे नांव श्रीरंग

पिता शामराव असे झाले आहे व त्याला शामरावकडील सर्व अधिकार मिळाले आहे. सदरचा दस्त निशाणी ३६ प्रमाणे असल्याचे सांगीतले आहे. उलटतपासामध्ये त्यांनी काहीबाबी मान्य केलेल्या आहे. त्या सर्व तांत्रीकबाबी आहे. निशाणी ३६ च्या दस्ताबाबत कोणतीही महत्वाची कबुली त्यांनी दिलेली नाही.

१४. अर्जदारातर्फे अमृता पिता सखाराम काळे यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे त्यानुसार अमृता दिनांक २४.०४.२०१६ रोजी मरणपावल्याची नोंद आहे. श्रीरंगचे आधार कार्ड दाखल केले आहे त्यानुसार श्रीरंगचे नांव श्रीरंग पिता अमृता काळे असे आहे. तसेच, श्रीरंगचा शाळा निर्गम उतारा दाखल केला आहे त्यामध्ये श्रीरंगचे नांव श्रीरंग अमृता काळे असे नमुद आहे त्यामध्ये दिनांक २८.०६.१९६७ रोजी असे नमुद आहे. तसेच, रेशनकार्डची झेरॉक्स दाखल केली आहे.

१५. वरील दिलेला पुरावा व दाखल केलेले कागदपत्र व गैरअर्जदारांचा पुरावा व त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे यांचा एकत्र विचार केला असता अर्जदार क्र.१ मयत अमृताचा मुलगा असल्याचे त्याचे म्हणणे आहे परंतु, गैरअर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र.१ दत्तकपत्रानुसार शामरावला दत्तक दिलेला आहे त्यामुळे तो अमृताचा वारस राहीलेला नाही अश्या परिस्थीतीत दिलेल्या पुराव्याचा विचार केला असता अर्जदार क्र.१ ने दत्तकपत्राचा मजकुर निशाणी १ मध्ये व दिलेल्या पुराव्यामध्ये नमुद केलेला नाही व सदर बाब न्यायालयापासून लपवून ठेवली आहे. अमृताचा मुलगा जरी अर्जदार क्र.१ श्रीरंग आहे असे गृहीत धरले तरी गैरअर्जदारांनी तो शामरावला दत्तक गेला आहे म्हणून अमृताचा वारस राहलेला नाही असा बचाव घेतलेला आहे व त्यासाठी दत्तकपत्र निशाणी ३६ गैरअर्जदारातर्फे साक्षीदार क्र.२ दुय्यम बंधक, वसमत यांच्याकडून सिध्द केलेले आहे. निशाणी ३६ च्या दस्ताचे वाचन केले असता सदर दस्त मयत अमृता पिता सखाराम काळे यांनी शामराव पांडोजी काळे यांच्याकडून लिहुण घेतले आहे व त्यामध्ये शामरावने मयत अमृताला असे लिहुण दिले आहे की, श्रीरंग याला दत्तक घेतले आहे व दत्तक विधान व ईतर सर्व संस्कार पुर्ण केलेले आहे व श्रीरंगचे नांव श्रीरंग अमृता ऐवजी श्रीरंग शामराव असे झाले आहे व शामरावचाच अवरस मुलगा म्हणून सर्व हक्क

मिळालेले आहे. सदर दस्तावर सर्वांचे नावे व अंगठे आहे. सदर दस्त मयत अमृताने शामरावकडून लिहुण घेतला आहे व शामरावने असे लिहुण दिले आहे की, शामरावचा नातुन श्रीरंग याला त्याने दत्तक घेतलेले आहे त्यामुळे श्रीरंग अता अमृताचा मुलगा राहीलेला नाही असे सदर दस्तावरुन सिध्द होते. सदर दस्त दिनांक १९.०२.१९७९ रोजी नोंदविण्यता आलेला आहे. सदर दस्त अमृताचे दत्तक पिता शामराव यांनी मयत अमृताला लिहुण दिलेला आहे. सदर दस्तांनुसार अर्जदार क्र.१ श्रीरंग मयत अमृताचा मुलगा राहीलेला नाही व या निशाणी ३६ च्या दत्तकपत्रानुसार श्रीरंग मयत अमृताचा वारस होवू शकत नाही व त्याला वारस प्रमाणपत्र मागण्याचा अधिकार नाही ही बाब निशाणी ३६ व गैरअर्जदारांनी दिलेल्या पुराव्यावरुन सिध्द होते.

१६. अर्जदार क्र.१ चे रेशन कार्ड, शाळा निर्गम उतारा व ईतर कागदपत्रांमध्ये जरी श्रीरंग पिता अमृता काळे असे नाव नमुद असले तरी त्या कागदपत्रांवरुन अर्जदार क्र.१ श्रीरंगचा वारस आहे हे सिध्द होत नाही.

१७. तसेच, अर्जदार क्र.१ ने त्याच्या उलटतपासात हे मान्य केले आहे की, त्यानी केलेला अर्ज शेतजमीनीसाठी केलेला आहे यावरुन जमीनीसाठी वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जदारांनी केलेली आहे हे सिध्द होते. गैरअर्जदार क्र.२ ने त्याच्या पुराव्यात सांगीतलेल्या बाबींवर अर्जदारांचा हक्क सिध्द होत नाही. तसेच, गैरअर्जदार क्र.१ ने पुराव दिला नाही म्हणून अर्जदारांचा अर्ज सिध्द होत नाही.

१८. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या नावाने वारसप्रमाणपत्र दयावे अशी मागणी अर्जदार यांनी निशाणी १ मध्ये केलेली आहे या उलट गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र.१ वारस नाही म्हणून अर्जदार क्र.२ व गैरअर्जदार हेच वारस आहे म्हणून त्यांच्या नावाने वारसप्रमाणपत्र मिळावे अशी मागणी केली आहे. गैरअर्जदारांची मागणी या अर्जामध्ये विचारात घेता येणार नाही कारण त्यांनी स्वतंत्र अर्ज केलेला नाही. अर्जदार क्र.१ मयत अमृताचा मुलगा होता व तो निशाणी ३६ च्या दत्तकपत्रानुसार शामरावला दत्तक गेला आहे त्यामुळे आता तो मयत अमृताचा कायदेशीर वारस होत नाही. म्हणून अर्जदार क्र.१ वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र नाही.

१९. निशाणी ३६ दत्तकपत्र अर्जदार यांनी नाकारले आहे. दत्तकपत्राचा वाद तसेच, अर्जदार क्र.१ श्रीरंग, अमृताचा मुलगा होता व तो वारस आहे हा वाद या अर्जामध्ये निकाली काढता येणार नाही. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये उत्पन्न झालेला वाद अतिशय किचकट व सखोल पुरावा झाल्याशिवाय निकाली निघणार नाही. तसेच, वारसप्रमाणपत्राची मागणी मयत अमृताच्या मिळकतीसाठी आहे त्यामुळे दिवाणी दावा दाखल करुन त्यांच्यामधील वाद दिवाणी न्यायालयातच निकाली निघू शकतात या अर्जानुसार दत्तकपत्र व त्याबाबतचा वाद तसेच, अर्जदार क्र.१ श्रीरंग वारस आहे किंवा नाही हा वाद दिवाणी डिक्रीशिवाय निकाली निघू शकत नाही म्हणून हा अर्ज मंजुर होण्यास पात्र नाही.

२०. तसेच, बॉम्बे रेग्युलेशन कायद्याचे कलम २ नुसार जरी वारस प्रमाणपत्र देण्याची अधिकार या न्यायालया असले तरी कलम ४ नुसार वारस प्रमाणपत्र देण्याचा अर्ज न्यायालय नाकारुन शकते जर अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामधील वाद डिफीकल्ट स्वरुपाचा असल्यास तसेच, सदर वाद दिवाणी न्यायालयाने निकाली काढल्याशिवाय निकाली निघणारा नसल्यास न्यायालय अर्जदारांचा अर्ज नाकारु शकते अशी तरतुद आहे.

२१. तसेच, अर्जदार यांनी केलेल्या कथनावरुन व गैरअर्जदार यांनी नोंदवलेल्या आक्षेपावरुन व अर्जदारांनी दिलेल्या पुराव्यावरुन व अर्जदाराने तिच्या उलटतपासामध्ये दिलेल्या महत्वाच्या कबुली वरुन व गैरअर्जदार यांनी दिलेल्या पुराव्यावरुन व वरील सर्व कारणामुळे अर्ज मंजुर होण्यास पात्र नाही. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामधील वाद दिवाणी न्यायालयाने निकाली काढल्याशिवाय अर्जदार वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र नाही. तसेच, वरील सर्व कारणांवरुन अर्जदारांचा अर्ज कलम ४ बॉम्बे रेग्युलेशन अक्ट नुसार नामंजुर होण्यास पात्र आहे. अर्जदार याने दिलेल्या पुराव्यावरुन अर्जदार व गैरअर्जदार मयत अमृताचे वारस आहे ही बाब वरील सर्व कारणांवरुन सिध्द होत नाही म्हणून मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नाही म्हणून देण्यात येतो. तसेच, वरील सर्व कारणांवरुन अर्जदार क्र.२ व गैरअर्जदार क्र.१ व २ हे मयताचे फक्त वारस आहे ही बाब देखील गैरअर्जदार यांनी दिलेल्या पुराव्यावरुन सिध्द होत नाही. म्हणून मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष नाही म्हणून देण्यात येतो.

**<u>मुद्दा क्र.३ करीताः</u>**

२२. मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्षावरुन अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार वारसप्रमाणपत्र मिळण्यास अर्जदार पात्र नाही. म्हणून हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

:: **<u>आदेश</u>** ::

०१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.

०२. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात श्रुतीलेखन करुन जाहीर करण्यात आला.

AJAY DATTATRAY PUNDLIK Digitally signed by AJAY DATTATRAY PUNDLIK Date: 2026.03.30 12:41:03 +0530

**( अ. द. पुंडलिक )**

दिनांकः ३०.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) वसमत,
ता. वसमत, जि. हिंगोली.